## प्रकरण चौथे

## उ प सं हा र

# प्रकरण चौथे

## उ प सं हा र

मागील तीन प्रकरणामध्ये स्त्रीयांचा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर अभ्यास करत असताना यातील पहिल्या प्रकरणामध्ये "राजकारण आणि राजकीय सहभाग" या संकल्पनांचा थोडक्यात अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. "राजकारण" ही संकल्पना पहात असताना ती दोन पध्दतीने मांडता येते.

१) एखादी व्यक्ती कार्यालयांना नियंत्रणामध्ये ठेवण्याचा प्रयत्न करत असते.

२) एखाद्या वादाच्या किंवा चर्चेच्या विषयाबद्दल नागरि समाजाशी संबंधित राहून प्रश्न सोडवणूकीसाठी प्रयत्न करणे.

परंतु राजकारण हे व्यावसायिक दृष्टीने सहभागी होण्यासाठी नाही तर ते देशाला आदर्श घालून देवून, पुढे येऊन जाणाऱ्या प्रत्येक नागरिका-साठी आहे.

तसेच राजकारण या संकल्पनेचा अभ्यास करत असताना अलमंड आणि व्हेब या विचारवंताच्या व्याख्येचा आधार घेण्यात आलेला आहे. त्यांच्या मतानुसार "राजकारण म्हणजे शक्ति आत्मसात करणे किंवा राजकीय घडामोडींमध्ये सहभागी होऊन एखाद्या ठरावाला निश्चित करण्याचे साधन होय". तर मिलबर्थ, कॅम्पबेल, ने आणि मिलर यांच्या मतानुसार, राजकीय सहभाग म्हणजे, "गटाची कृती, मतदान, सार्वजनिक कार्यालयाशी लेखन,

अशा गोष्टी की, ज्या राजकीय शक्ति वाटवण्यापेक्षा राजकीय कृतींशी निगडीत आहेत." या व्याख्येवरुन स्त्रियांचा राजकीय सहभाग कितपत आहे हे पाहण्यासाठी या प्रकरणामध्ये पूर्व वेदिक काळापासून आजपर्यंतची माहिती घेतलेली आहे. त्याचबरोबर स्त्रियांच्या राजकीय सहभागावर प्रभाव पाडणा-या घटकांचाही अभ्यास यामध्ये करण्यात आलेला आहे.

या अभ्यासातील सामाजिक इतिहासावरुन असे स्पष्ट दिसून येते की, स्त्रियांची ही स्थिती सुधारण्याचा प्रयत्न वेगवेगळ्या धार्मिक चळवळीतून झाला आहे. म्हणूनच स्त्रियांच्या दर्जात सुधारणा करणारे धर्म उदा. बौध्दधर्म, जैनधर्म, यांच्या मार्फत तसेच भक्ति चळवळ, सामाजिक सुधारणा चळवळ, ब्राह्मसमाज, आर्यसमाज, प्रार्थना समाज सर्वांच्या मार्फत हा प्रयत्न झाला असला तरीही एक गोष्ट यातून स्पष्ट होते ती म्हणजे या सामाजिक धार्मिक चळवळींचा अभिजन दृष्टिकोन होता की, ज्यांच्या माध्यमातून केवळ स्त्रीला सामाजिक व्यवस्थेच्या चौकटीतच राहून बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. परंतु या प्रयत्नाला महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फूले यांची "सत्यशोधक" चळवळ ही अपवाद ठरु शकते. कारण या सत्यशोधक चळवळीने सामाजिक व्यवस्थेलाच स्त्रियांच्या शोषणाचे मुळ कारण मानले गेले होते.

मोतिलाल बनारसीदास यांच्या मतानुसार वर्गीकृत समाजाची क्रांती की जी नंतरच्या काळात वर्ण व शूद्र जाती व्यवस्थेमध्ये बदलली, तो कालावधी म्हणजे मनूस्मृतीचा आणि स्त्रियांच्या हिनतेच्या सुरुवातीचा कालावधी आहे." वेदिक काळातील गार्गी, मैत्रेय, अत्रेय, आम्रपाली, मिरा, राणी कित्तूर चण्णाम्मा यासारख्या हुशार व प्रतिभाशाली स्त्रियांशिवाय सर्व

स्त्रियांचे जीवन आणि त्यांचे दुय्यम स्थान मनूकोडमध्ये दाखवले आहे. मुलगी म्हणून तिच्या बापाच्या, पत्नी म्हणून तिच्या पतीच्या, आणि विधवा म्हणून तिच्या मुलग्याच्या ती देखरेखीखाली असावी असे "मनूस्मृती" म्हणते. वेदिक काळापासून सर्व सामाजिक आणि सांस्कृतिक दुय्यम स्थानाचे विश्लेषण केल्याने ते समजण्यासाठी पुरेसे आहे. तरी सुध्दा वेदिक संस्कृतीनंतर "स्त्रीधन" म्हणून जो संपत्तीचा हक्क प्राप्त झाला आहे तो हक्क म्हणजे पारंपरिक स्वातंत्र्य होय. परंतु या स्वातंत्र्याच्या अर्थाचा स्विकार व त्याग हा मुद्दा अजूनही वादातीत आहे. तेंव्हापासून बौध्द भिक्षूनिंनी ज्याचा स्विकार केला आहे त्याने एक नविनच क्षेत्र स्त्रियांच्यासाठी निर्माण केलेले आहे. उमा चक्रवर्ती यानी दर्शविल्याप्रमाणे संघामध्ये सुध्दा अनुभवी स्त्रिया तारतम्य भाव सोडून वागतात. आणि त्यामध्येही स्त्रियांचे दुय्यम स्थान दिसून येते. त्याच बरोबर आणखी एक धार्मिक स्वातंत्र्य स्त्रियांना दिलेले आहे ते म्हणजे भक्ती चळवळीचे स्वातंत्र्य होय. या चळवळीमुळे स्त्रियांमध्ये अक्कमहादेवी, बहिणाबाई, लल्ला आणि मिराबाई सारख्या संत स्त्रिया निर्माण झाल्या. ज्यावेळेपर्यंत ही भक्तिचळवळ धार्मिक क्षेत्रापुरती व व्यक्तिगत मोक्षापुरती मर्यादित स्वरूपाची होती त्यावेळेपर्यंत स्त्रियांचे सामाजिक प्रश्न सुटले नाहीतच तर अधिक गुंतागुंतीचे बनत गेले. परिणामत: त्यामुळे स्त्रियांचे स्थान दुय्यम दर्जाचे राहीले. या काळात धार्मिक कर्मकांडामुळे स्त्रियांच्या दर्जात फारशी सुधारणा झाली नाही.

१९व्या शतकातील समाज सुधारणेची चळवळ ही स्त्रीचे दुय्यम स्थान लक्षात आणून देणारी असून ती स्त्रियांचा दर्जा कमी असण्यासंबंधी बाल-विवाह, विधवेचा छळ, पुनर्विवाह, बहूपत्नीत्व, सतीची चाल, स्त्रियांचे मालमत्तेविषयीचे अधिकार आणि शिक्षण या विषयीची नकारात्मक

भूमिका यावर लक्ष केंद्रित करने असे असूनही ही प्रक्रिया पारंपरिक समाजात कुटुंबातील स्त्रियांची स्थिती व त्यांच्या सुधारणे विषयी मर्यादित स्वरूपाची होती. मात्र याच काळात अशा कांही संस्था होत्या की ज्या प्रचलीत समाजव्यवस्थेवर आघात करणाऱ्या होत्या. त्यामध्ये ब्राम्होसमाज, आर्य समाज, प्रार्थना समाज, ईश्वरी साक्षात्कार घडवून आणणारी संस्था इत्यादींचा समावेश होता.

वरील सर्व बाबींवरून आपणास असे दिसून येते की, समिर अमिन यांच्या "परावलंबत्वाच्या सिध्दांना" प्रमाणे समाजातील स्त्री वर्गाला पुरूषप्रधानतेने राजकीय व अधिकारात्मकदृष्टया बाजूला ठेवले गेले. स्त्रीने "चूल आणि मुल" यांच्या शिवाय दुसरे कोणतेही अधिकार उपभोगू नयेत यासाठी व्यवस्थित व्यूह रचना तयार केली व ती सामाजिक चौकटीत बसवण्यात आली आणि त्याद्वारे स्त्रीला गौणत्व देण्यात आले. म्हणजेच स्त्रीला समाजातून बाहेरही काढावयाचे नाही व पुरूषांच्या बरोबरीचे स्थानही द्यावयाचे नाही. अशी सामाजिक चौकट तयार करण्यात आली.

परंतु नंतरच्या काळात स्त्रियांचे प्रश्न सोडवण्याची गरज वाटू लागल्यामुळे स्त्रियांमध्ये राजकीय जागृती निर्माण होऊ लागली. पुरूषांच्या बरोबरीने राजकारणात आपण सहभागी होऊ शकतो याची जाणीव त्यांना हळू हळू होऊ लागली. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्यपूर्व काळात कांही मोजक्याच स्त्रिया स्वातंत्र्याच्या चळवळीत उतरू शकल्या. त्यानंतर पुढे त्यांनी पुरूषांच्या बरोबरीचा मतदानाचा अधिकार आपणास मिळाला पाहिजे यासाठी ब्रिटिश सरकार विरूध्द आवाज उठवला. ॲनिबेझांटसारख्या स्त्रियांना भारतीय स्त्रियांचे नेतृत्व स्वीकारून त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यास सुरूवात केली.

सतीची चाल बंद करणे, बालविवाह बंद करणे अशा मागण्याद्वारे चळवळीस बळकटी प्राप्त झाली. त्यामुळे सरकारला स्त्रियांना मतदानाचा अधिकार द्यावा लागला. सन १९५१ मध्ये घटनात्मक तरतूदी नुसार स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांचे प्रश्न सोडवणूकीसाठी १ स्त्री राखीव जागा निर्माण झाली. परंतु या तरतूदीनुसार स्त्रियांना आपले प्रश्न सोडवणे शक्य झाले नाही. कारण पुरूष जातीचा पगडा समाज व्यवस्थेवर असल्याने त्या आपल्या मागण्या मंजूर करून घेऊ शकल्या नाहीत. या सर्व गोष्टी सरकारच्या निदर्शनास आल्याने सन १९६८ मध्ये पुन्हा त्यांच्या जागेत वाढ करण्यात आली. त्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये स्त्रियांसाठी २ जागा राखीव करण्यात आल्या. परंतु या जागा वाढवून सुध्दा स्त्रियांच्या प्रश्नाची दखल घेतली केली नाही. मात्र स्त्रियांनी आपल्या चळवळी चालूच ठेवल्या. समाजात स्त्रीला पुरूषाबरोबरीचे स्थान मिळावे, त्यांचा अधिकारात व राजकीय सहभागातील सदस्य संख्येत वाढ व्हावी यासाठी त्या सतत आंदोलन उभा करत होत्या.

दरम्यानच्या काळात सन १९७१ ते १९७४ मध्ये केंद्रशासनाने स्त्रीला कोणत्या घटकांमुळे समाजात स्थान मिळत नाही. याची कारण शोधण्यासाठी "भारतीय समाजात स्त्रीचे स्थान" या नावाची समिती नेमण्यात आली. परंतु या विषयीचा अभ्यास होऊन सुध्दा त्यातून स्त्रीच्या सामाजिक स्थानाबद्दल कोणत्याही प्रकारची उपाययोजना निश्चित करण्यात आली नाही. याचा परिणाम म्हणून भारतात पूर्वीपेक्षा ७० ते ८० टक्के पेक्षा जास्त प्रमाणात स्त्री चळवळींचा जोर वाढला. त्यामुळे शासनास स्त्रियांसाठी महिला धोरणात बदल करून सन१९९० मध्ये ३० टक्के राखीत जागा ठेवाव्या लागल्या.

या ३० टक्के महिलांच्या राजकीय सहभागातील आरक्षणामुळे महिलांना

काम करण्यास सुसंधी मिळाली या संधीचा फायदा घेऊन त्या विविध क्षेत्रात काम करत असलेल्या दिसून येतात. ३० टक्के महिला राखीव जागा केल्याने स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये राजकीय सहभाग घेणा-या स्त्रियांच्यामुळे खालील बदल झालेले दिसून येतात.

१) महिलांना नगरपालिकेच्या कारभारात काम करण्याची संधी मिळाली.

२) महिलांच्या सदस्य संख्येत वाढ झाली.

३) उच्च वर्गीय,उच्च वर्णीय यांच्या बरोबरच मध्यम वर्ग, मागास व इतर मागासवर्गीय महिलांना राजकीय कारभारात सहभाग मिळाल्याने त्यांच्यामध्ये गुणात्मक, लक्षणीय बदल घडून आला.

४) महिला या जनरल सभेला हजर राहिल्यामुळे नगरपालिका सदस्यांच्या गैरवर्तनाला आळा बसला.

५) जनरल सभेत महिलांच्या उपस्थितीमुळे सदस्यांच्या वर्तनात्मक व वैकल्पिकदृष्टया बदल घडून आला.

६) विविध समित्यांवर मंजूर करण्यात आलेला पैसा ख-या अर्थाने त्यावरच व तेवढाच खर्च होतो की नाही याकडे लक्ष राहू लागले.

७) महत्त्वाची सुधारित कामे अंगीकारली जावू लागली.

८) मंजूर करण्यात आलेली कामे कोणतीही टाळाटाळ न करता वेळच्या वेळी पूर्ण होऊ लागली.

९) भ्रष्टाचारासारख्या घटनांना आळा बसला.

१०) हुशार आणि दक्ष नगरसेविकांच्या कडून लोक सुधारित कामे करून घेऊ लागले.

११) विश्वास व कर्तव्यदक्षता यामुळे त्या समाजाच्या विश्वासास पात्र ठरल्या.

१२) या सर्वच आधारामुळे महिला नगरपालिकेच्या राजकीय सहभागात त्यांना वाढते स्थान मिळत आहे.

१३) स्त्रियांचे प्रश्न सोडवणाऱ्या समित्यांवर, महिला प्रतिनिधींचे लक्ष राहिल्यामुळे त्यांचे प्रश्न मार्गी लागले.

१४) स्त्रियांचा राजकीय कारभारात सहभागी होण्याचा आत्मविश्वास वाढला. मुरगूड नगरपालिकेचा विशेष अभ्यास करताना असे दिसून आले की, स्त्रियांच्या पारंपरिक समित्यांवर सदस्य म्हणून नेमणूकी झाल्या. तसेच स्थायी समिती, सार्वजनिक बांधकाम समिती, जकात समिती अशा विविध समित्यांवर कारभार करण्यास संधी मिळाली.

स्त्रियांच्या नगरपालिकेतील कारभाराबाबत लोकांना विचारले असता, त्यांनी महिलांच्या कारभाराला पाठींबा दर्शविला व त्यांच्या कामाबद्दल आणि नियोजनाबद्दल विश्वास व्यक्त केला.

पुन्हा नगरपालिका निवडणूकीसाठी उमेदवारी मिळविण्यासाठी या स्त्री प्रतिनिधींना विचारले असता त्यातील ४ स्त्री सदस्यानी पतीवर अवलंबून असलेले सांगितले. तर उर्वरीत ४ स्त्री सदस्यानी आपण स्वत:हून निवडणूक लढविणार असल्याचे सांगितले.

यावरून असे दिसून येते की, नगरपालिकेच्या राजकीय कारभारात नगरसेविकंचा सहभाग वाढून त्यांच्या राजकीय कार्यक्षमतेत गुणात्मक वाढ झालेली आहे.

वरील सर्व बाबींचा चिकित्सक अभ्यास केल्यानंतर आपल्या हे निदर्शनास येते की, स्थानिक स्वराज्य संस्थेमधील राजकीय कारभारात स्त्रियांना संधी मिळण्यासाठी खालील घटक कारणीभूत ठरतात.

१) राजकीय पार्श्वभूमी :

राजकीय पार्श्वभूमी असलेल्या स्त्रीया राजकारणात सहभागी होण्यास तयार असतात. कारण त्यांना त्यांच्या घरातूनच राजकीय कारभाराविषयी थोडीफार कल्पना आलेली असते. तसेच कुटुंबातील सदस्यांच्या बरोबर तिने सहभागसुध्दा घेतलेला असतो. उदा. सौ. शकुंतला नेताजी गोधडे या स्त्री सदस्याने वडीलांच्याकडे असताना आजोबांच्या बरोबर स्थानिक निवडणूकीं- मध्ये सहभाग घेतला होता. अशा स्त्रीया राजकीय पार्श्वभूमी असलेने राजकीय सहभाग घेत असतात.

२) राजकीय वातावरण :

ज्यांच्या घरातील वातावरण राजकीय आहे अशा घरातील स्त्रीया देखील राजकीय सहभाग घेवू शकतात. त्यामध्ये सौ. आनंदी रामचंद्र भारमल या स्त्री सदस्या उत्तम उदाहरण होते. कारण त्यांच्या घरचे वातावरण पूर्णपणे राजकीय आहे. परंतु त्यांच्यावर बालपणी राजकीय प्रभाव जानवत नव्हता. तरूणपणी त्यांच्या घरगुती राजकीय वातावरणामुळे त्यांना

राजकारणात सहभागी व्हावे असे वाटू लागले. त्या बाहेरच्या जबाबदारी जुळवून घेतात त्याच बरोबर त्या राजकीय व सामाजिक चळवळीमध्ये सहभागी होत असतात.

३) <u>रिकामा वेळ असणाऱ्या स्त्रिया :</u>

ज्यांच्या घरी रिकामा वेळ असतो, ज्यांना इतर कांही कामे नसतात अशा स्त्रिया राजकीय कारभारात सहभागी होत असतात. रिकामा वेळ असल्याने त्यांना वृत्तपत्रे वाचून, इतर साहित्य वाचून, दूरदर्शन मार्फत तसेच रेडिओद्वारे त्यांना राजकीय सहभागाविषयी माहिती मिळत असते. त्यामुळे अशा स्त्रियांना राजकीय कारभाराची आवड निर्माण होत असते. त्यामुळे त्या राजकीय कारभारात सहभागी होत असतात.

४) <u>राजकारणाची आवड :</u>

राजकारणाची आवड असणाऱ्या स्त्रिया या सहजपणे राजकीय कारभारात प्रवेश करु शकतात. त्याला राजकीय पार्श्वभूमि, राजकीय वातावरण या घटकांची आवश्यकता नसते. उदा. सौ. गौराबाई बजरंग सोनुले या मागासवर्गीय स्त्रीराखीव प्रतिनिधी होत्या. त्यांची राजकीय पार्श्वभूमी व घरातील राजकीय वातावरण नसताना केवळ राजकारणाची आवड असल्याने त्या प्रतिनिधी म्हणून राजकीय कारभारात समाविष्ठ झाल्या.

५) <u>शिक्षण :</u>

मात्र शिक्षण या घटकामुळे राजकीय कारभारात प्रवेश मिळवता येतो असे नाही. कारण कांही अशिक्षित किंवा अल्प शिक्षित स्त्रिया सुध्दा

स्त्री प्रतिनिधी म्हणून उत्तम प्रकारे कारभार करू शकतात. उदा. सौ.सोनाबाई विष्णूपंत जाधव यांचे शिक्षण जूनी ३ री पर्यंत झालेले आहे. परंतु घरातील इतर लोकांच्या मदतीने त्या उत्तम प्रकारे राजकीय कारभारात सहभागी होऊ शकतात. म्हणजेच राजकीय प्रक्रियेत सहभागी होणे हे शिक्षण या घटकांवर आधारित नसून त्यांची सामाजिक व राजकीय आवड यांच्यावर आधारित आहे.

६) राखीव जागा :

३० टक्के राखीव जागा असल्याने स्त्रियांना राजकारणात सहभागी होण्याची संधी मिळत गेली. त्यामुळे त्यांना स्त्रियांचे विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी मदत झाली. या ३० टक्के राखीव जागांमुळे सर्वसाधारण स्त्रिया व मागासवर्गीय स्त्रियांना राजकीय कारभारात काम करण्याची संधी मिळाली आहे.

३० टक्के स्त्री राखीव जागा असलेने त्यांना राजकारणात संधी मिळत आहे. हे जरी खरे असले तरी सुध्दा सामाजिक संस्कृतीमुळे हा सहभाग अजूनही अल्प प्रमाणात दिसून येतो. कारण सामाजिक संस्कृतीमुळेच मानवाच्या व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण होत असते. अजूनसुध्दा भारतीय स्त्री ही पारंपरिक समाजव्यवस्थेमध्ये रहात असल्यामुळे तिचा राजकीय सहभाग हा अल्प प्रमाणात आहे. परंतु जर या स्त्रियांना राजकीय कारभारात सहभागी करून घ्यावयाचे असेल तसेच त्यांची कार्यक्षमता वाढवावयाची असेल तर या सामाजिक वातावरणात बदल घडवून आणला पाहिजे. तशी आज त्या बदलाची सुरुवात झालेली आहे. त्यामुळे आजची स्त्री ही राजकीय क्षेत्रात सहभागी होऊ पहात आहे. तसेच ती आपल्या हक्काची मागणी करीत आहे.

या स्त्रियांच्या राजकीय जागृतीमध्ये महाराष्ट्र राज्य आघाडीवर आहे. या नुसार महाराष्ट्रात स्त्री चळवळीची आग्रही मागणी म्हणून सुरुवातीस शासनाने सन १९९० मध्ये राजकीय कारभारात भाग घेता यावा म्हणून ३० टक्के स्त्रियांच्यासाठी राखीव जागा केल्या. त्याचा पुढील टप्पा म्हणून स्त्रियांना विविध क्षेत्रात संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी सन १९९४ मध्ये शासनाने स्त्रियांना सर्व सेवांमध्ये ३० टक्के जागा राखीव ठेवल्याचे घोषित केले.

परंतु ३० टक्के राखीव जागा करुन देखील स्त्रियांची परिस्थिती फारशी सुधारलेली आहे असे वाटत नाही. कारण राखीव जागांवर निवडून आलेल्या स्त्रियांमध्ये कार्यक्षमता असूनसुध्दा त्यांना या समाजाच्या व्यवस्थेमध्ये राहून राजकारणाच्या मुख्य प्रवाहामध्ये सहभागी होऊ दिले जात नाही. त्यांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान देत असतात. स्त्रियांना मात्र "परिघ आणि मुख्यप्रवाह" यापासून बाजूला ठेवले जात आहे.

परंतु मुरगूड नगरपालिकेतील निवडून आलेल्या स्त्रियांच्या मुलाखतीवरुन असे दिसून येते की, स्त्रीला आज जरी परिघात काम करावे लागत असले तरी सुध्दा तिची निवडणूकीमध्ये स्वतंत्र पध्दतीने उभे राहाण्याची मानसिक तयारी झालेली आहे. स्त्रिया हळूहळू राजकीय कारभारात सहभागी होत असतानाचे दिसून येत आहे.

.......

## - ग्रंथसूची -


- वुमन इन दि वेदीक एज, शकुंतला राव शास्त्री, भारतीय विद्या भवन, मुंबई, १९५१.
- रिलीजन ॲण्ड कल्चर, डॉ. एस्. राधाकृष्णानन्, हिंदू पॉकेट बुक्स्, दिल्ली, १९८०.
- मेंटेन ॲन्ड सोसायटी इन महाराष्ट्रा, डॉ. के.जगन्नाथ शर्मा, प्रोजेक्ट ऑफ यु.जी.सी., गुंटूर, आंध्रप्रदेश, १९८६.
- कास्ट्स् इन इंडिया, डॉ. बी.आर. आंबेडकर.
- इंडियन वुमन, देवकी जैन प्रकाशक, प्रकाशन विभाग, भारत सरकार, १९७५.
- वेदमिमांसा, स्वामी विद्यानंद सरस्वती, दिल्ली, १९८४.
- वैदिक संस्कृतीचा विकास, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, दूसरी आवृत्ती, १९७९.
- वुमन लिबरेशन ॲन्ड रॉल्यूशेनटरी ॲक्शन, कल्पना शाहा, अजंठा प्रकाशन, दिल्ली, १९८४.
- "हिंदूइझम ॲन्ड वुमन" माळादी सुब्बाम्मा, अजंठा प्रकाशन, दिल्ली, १९९२.
- "स्त्री मुक्त( समतेकडे वाटचाल, कालिंदी देशपांडे, मागोवाप्रकाशन, मुंबई-३४, मार्च, १९८८.
- स्त्री मुक्ती केंव्हा व कशी १, सुशिला गोखले, परेल, महिला आंदोलन पत्रिका प्रकाशन, १९८४.

- जोतीबा फूले आणि स्त्री मुक्तीचा विचार, डॉ. गेल ऑम्व्हेट, लोकवाङ्.मय ग्रह, मुंबई, नोव्हेंबर, १९९०.

- स्त्री आणि राजकारण, डॉ. वासंती रासम, "सबला", जे.के. इन्स्टिट्यूट, गारगोटी, प्रकाशन, १९९२.

- हिंदू संस्कृती आणि स्त्री, आ.ह. साळुंखे, लोकवाङ्.मय गृह, मुंबई, १९८९.

- परिवर्तनाकरिता राजकारण व स्त्रिया, डॉ. रोहिणी गवाणकर, "सबला" जे.के. इन्स्टिट्यूट गारगोटी, प्रकाशन, १९९२.

- गांधी एम्.के., व्हुमेन अँन्ड सोशल जस्टीस, अहमदाबाद, नवजीवन प्रकाशन हाऊस, १९७०, पृ.४.

- हिंदू वुमन, प्रभावती मुखर्जी, ओरिएंट लॅंगमन, १९७८.

- द राईज अँन्ड फौल ऑफ हिंदू वुमन, डॉ. बी.आर. अंबेडकर, भिम पत्रिका प्रकाशन, जालंधर, १९७७.

- दि पोजिसन ऑफ वुमन इन इंडिया, कमला मुंबई, १९७१.

- हिंदू मॅरेज अँक्ट, १९५५.

- कास्ट्स इन इंडिया, डॉ. बी.आर. अंबेडकर, १९७४.

- सर्वोदय, एम्.के. गांधी, नवजीवन प्रकाशन, १९६९.

- दि पोजीसन ऑफ वुमन इन हिंदू सिव्हीलायझेशन, डॉ.ए.एस. आळतेकर, मोतीलाला बनारसीदास, दिल्ली, दुसरी आवृत्ती, १९७८.

- रणादिवे विमल, नुतन वर्क्स ऑफ इंडिया, कलकत्ता, नॅशनल बुक एजन्सी, १९७६.

- वुमन इन ऋग्वेदा, उपाध्याय, १९३२.

- स्त्री विमुक्ती, छाया दातार, संयुक्त स्त्री मुक्ती संघर्ष परिषद, पुणे, ऑक्टोबर, १९७५.

- पवित्र कुराण, डॉ. मौलवी मीर मोहम्मद याकूब खान, मराठी भाषांतर, १९८४.

- स्त्री अभ्यास व्यासपीठ/ आपल्यासाठी एक आपली जागा, डॉ. विद्या बाळ, "सबला" हे.के. इन्स्टिट्यूट गारगोटी, प्रकाशन, १९९२.

- सामाजिक आणि राजकीय चळवळीतील स्त्री सहभाग, मृणाल गोरे, "बसला" जे.के. इन्टिट्यूट गारगोटी, प्रकाशन, १९९२.

- प्राचीन चरित्र कोष, शिद्धेश्वर शास्त्री चिगाव, रेणूका, १९४४.

- हिस्ट्री ऑफ धर्मशाळा, डॉ. पी.व्ही. काने, दूसरी आवृत्ती, १९७४.

- मनुस्मृती, कांही विचार, नरहर कुरुंदकर, प्रथम आवृत्ती, १९८३.

- मुरगूड म्युनिसिपल कमेटी - स्थापना अहवाल, सन १९२१-२२.

- सरजाराव वजारत मा.आब. यांचा सिमा निश्चितीचा जाहिरनामा, सन १९२१.

- सन १९२१ च्या मुरगूड शहराच्या खानेसुमारी अहवाल.

- सन १९२१ च्या मुरगूड शहराच्या खानेसुमारी अहवाल.
- मुरगूड म्युनिसिपल कमेटीचा सन १९२२-२३ चा कामाचा वार्षिक अहवाल.
- मुरगूड म्युनिसिपल कमेटिच्या कामाचा सन १९२२-२३ चा वार्षिक अहवाल.
- मुरगूड म्युनिसिपल कमेटिचा सन १९२१ च्या शैक्षणिक ठराव.
- मुरगूड म्युनिसिपल कमेटिच्या सन १९२१-२२ चा कामकाज अहवाल.
- मुंबई सरकारच्या स्थानिक स्वराज्य व आरोग्य खात्याकडील सन १९५१ चा ठराव.
- मुंबई सरकारच्या नगरपालिका निवडणूक आदेश सन १९५१ नुसार
- नगरपालिकेचा निवडणूक कायदा, सन १९५६.
- शासनाचा, स्थानिक स्वराज्य संस्थेतील स्त्री राखीव जागा संबंधिचा कायदा सन १९६६.
- महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम
- रिपोर्ट - कमिटी ऑन व्युमन स्टेटस् इन इंडिया, १९७१-७४.
- महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपालिका (दुसरी सुधारणा), अधिनियम, १९९० (सन १९९० चा क्रमांक १३चा अधिनियम).
- महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपालिका निवडणूक अधिनियम परिपत्रक क्र.एम्.आय.एस्.१०९०/सीआर ७४/९०/नवि २०, दि. ३० जून, १९९०.
- मुरगूड नगरपालिकेचा सन १९९१-९२ चा कामकाज अहवाल.

- मुरगूड नगरपालिकेचा सन १९९१-९२ चा कामकाज अहवाल.

- मुरगूड नगरपालिकेचा सन १९९२-९३ चा कामकाज अहवाल.

- मुरगूड नगरपालिकेचा सन १९९३-९४ च्या कामकाज अहवाल.

- मुरगूड नगरपालिकेचा सन १९९४-९५ चा कामकाज अहवाल.

- कोल्हापूर महानगरपालिकेतील स्त्रियांचा राजकीय सहभाग, अप्रकाशित, यु.जी.सी. प्रोजेक्ट, डॉ. वासंती रासम.

- मुरगूड नगरपालिका सभा कामकाज नियमावली, १९९४.

.......

रिपोर्ट -

१) आय.सी.एस्.एस्.बी. स्टॅटयूज ऑफ वुमन इन इंडिया, दिल्ली, अलिद प्रकाशन, १९७५, पृ.७.

२) मिनीस्ट्री ऑफ एज्युकेशन, रिपोर्ट ऑफ द नॅशनल कमिटी ऑन वुमन्स एज्युकेशन, दिल्ली, मॅनेजर ऑफ पब्लिकेशन, १९५९.

३) रिपोर्ट ऑफ दी कमिटी ऑन स्टेटस् ऑफ वुमन इन इंडिया मिनीस्ट्री ऑफ एज्युकेशन ॲन्ड सोशल वेलफेअर, १९७४, पृ. १४८.

.......